(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. X / Issue – I ISSN 2277-8063

# भारतीय राष्ट्रवादाचे स्वरुप आणि विकास

डॉ.एस.पी.वेल्हाळ, राज्यशास्त्र विभाग, गोगटे-वाळके कॉलेज, बांदा

---

प्रस्तावना: आधुनिक काळात राष्ट्र आणि राष्ट्रभावना या संकल्पनांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे .भारताच्या इतिहासात 1857 च्या उठावानंतर राष्ट्रवादी भावनेचा विचार करण्यात आला .भारतात प्राचीन काळापासून राजसत्ताक पद्धती अस्तित्वात होती .'राजा' राज्याचे प्रतिक होते .'प्रजेच्या हितात राजाचे हित' असे कौटिल्याचे मत होते .राजा-प्रजा-राज्य याचे एकरुपत्व होते.

युरोपातील प्रबोधन चळवळीतून राष्ट्रवादी भावनेचा उदय झाला.1789 साली झालेल्या फ्रेंचराज्यक्रांतीने प्रस्तूत केलेल्या 'स्वातंत्र्य-समता-बंधुत्व' या तत्त्वात स्वातंत्र्याशी संबंधित राष्ट्रभावना होती .महाराष्ट्रात छ.शिवाजी महाराजांनी 'महाराष्ट्रधर्म 'वाढविण्याचे जे आवाहन केले होते, त्यात राष्ट्रभावना निश्चित होती .भारत खऱ्या अर्थाने राष्ट्रभावने लागती मिळाली ती1857च्या उठावानंतर.यात ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीविरुद्ध असंतोष राष्ट्रवादाच्या विकासाला कारणीभूत ठरला.

1857च्या भारतीयांच्या उठावाला दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी हजारो भारतीयांवर अत्याचार केले .त्यांचा छळ केला .भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाला व वाढलेल्या अर्थशोषणाला वाचा फोडण्यासाठी प्रयत्नांची गरज भासू लागली .अशा परिस्थितीत भारतीय उदारमतवादी विचारवंतांनी 1867च्या सुमारास सनदशीर मार्गाने ब्रिटिशांना विरोध करणारी संघटना जन्माला घातली.

भारतात 19व्या शतकाच्या उत्तरार्धात राष्ट्रवादाच्या उदयास व विकासाला मोठ्याप्रमाणात चालना मिळाली .भारतीयांनी सुरु केलेल्या सामाजिक व आर्थिक सुधारणा चळवळीमुळे समाज जागृत झाला .इंग्रजी शिक्षणाची संधी उपलब्ध झाल्याने भारतीयांना पाश्चिमात्य तत्त्वज्ञान आत्मसात करणे शक्य झाले .स्वातंत्र्य, सामाजिक समता, व्यक्तीस्वातंत्र्य, उदारमतवादयासारख्या विचारांनी भारतीय समाज प्रभावित झाला . याचकाळात भारतीय वृत्तपत्रांनी भारतीय समाजात नवविचारांचा प्रचार व राष्ट्रवादाला चालना देण्याचे कार्य केले.

**राष्ट्रवादाचा अर्थ**

राष्ट्र, राष्ट्रीयता व राष्ट्रवाद या तिन्ही संज्ञांचे मूळ नोटिओ (Notio) या लॅटिन शब्दात असून याचा अर्थ जन्म किंवा वंश असा होतो .त्यामुळे वंश हा सामान्यत : राष्ट्रभावनेचा पाया मानला जातो .17व्याशतकात राष्ट्र ही संज्ञा राज्याची वांशिक एकता या अर्थाने वापरली जात होती .फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या काळात 'राष्ट्र' संज्ञेद्वारेच राष्ट्रभक्ती सूचित होत होती .19व्या शतकापासून राष्ट्र संकल्पनेला देशाला मिळालेले व मिळवायचे असलेले स्वातंत्र्य किंवा सार्वभौमत्व असा अर्थ प्राप्त झाला .समान परंपरा, भाषा आणि संस्कृती यामुळे एकत्र आलेला लोकसमुदाय म्हणजे राष्ट्र होय .असा

लोकसमूह स्वत:चा सार्वभौम राजकीय समुदाय म्हणजेच राष्ट्रनिर्माण करतो .यादृष्टीने राष्ट्र म्हणजे सांस्कृतिक, भाषिक, वाशिंक आधारावर एकजिनसी असलेला लोक समुदाय होय .आज जगातील कोणतेही राष्ट्रवरील निकष पूर्ण करीत नसले तरी 'राष्ट' ही संकल्पना सर्वत्र अत्यंत प्रभावी आहे .हॅन्स कोहान यांच्या मते 'राष्ट्रवाद हा राष्ट्र-राज्याची मागणी करतो आणि राष्ट्र राज्याच्या निमिर्तीमुळे राष्ट्रवाद प्रबळ होतो .मॅक्सवेबरच्या मते राष्ट्र हा असभावनाशील समुदाय आहे की, जो स्वत:ला राज्याच्या रुपाने साकार करतो . राष्ट्रवाद ही एक चळवळ असून ती राष्ट्र-राज्याची स्थापना करते .थोडक्यात राज्यातील सर्व व्यक्ती वा गटांची राष्ट्राप्रती निष्ठा असणे महत्त्वाचे असते .लोकांनी राष्ट्रनिष्ठ असलेच पाहिजे.

**भारताचा राष्ट्रवाद - पार्श्वभूमी**

इ.स.1757 ते 1857 हा भारतातील ब्रिटीश साम्राज्यशाहीचा काळ होय . 1857च्या युद्धात भारतीयांनी राष्ट्रवादांचे प्रदर्शन घडविले .त्यानंतर 1885 साली राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेमुळे भारतीय राष्ट्रवादाला चालना मिळाली .भारतामध्ये राष्ट्रीयतेच्या भावनेस खालील घटक कारणीभूत ठरले.

1) इंग्रजी साम्राज्यामुळे हिंदुस्थानात एकछत्री राजवट सुरु झाली.
2) इंग्रजांनी केलेल्या दळणवळणाच्या सुविधेमुळे हिंदुस्थानात सर्वदूर पसरलेल्या जनतेचा परस्पर संबंध आला.
3) इंग्रजी शिक्षणामुळे पाश्चिमात्य संस्कृती, विज्ञान व विचारसरणी इत्यादींशी भारतीयांचा संबंध आला.
4) भारतीय समाजामध्ये धामिर्क, सामाजिक सुधारणेची चळवळ सुरु झाली .राजाराम मोहन रॉय, ज्योतिबा फुले, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, न्या.रानडे, आगारकर, गोखले, ॲनीबेझंट, विद्यासागर, इ .थोर व्यक्ती आणि प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन या प्रमुख संस्थांच्या प्रयत्नांमुळे राष्ट्रवादास जास्त चालना मिळाली.
5) बाळ गंगाधर टिळक, बिपिनचंद्रपाल व लाला लजपतराय या तिघांनी जहाल राष्ट्रवाद स्वीकारला .'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशा प्रकारचा प्रखर शब्दांनी लोकमान्यांनी भारतीय राष्ट्रवादी भूमिका मांडली.
6) दादाभाई नौरोजी, म.गांधी, पं.नेहरु, डॉ.आंबेडकर इ .भारतीय पुढाऱ्यांनी राष्ट्रवादास सामाजिक, आथिर्क व नैतिक अधिष्ठान प्राप्त करुन दिले.
7) लॉर्ड रिपनचे दडपशाही धोरण व इंग्रजी शासनाने केलेल्या जाचक कायद्यामुळे भारतीय जनता त्रस्त झाली होती .त्याचा परिणाम म्हणूनच भारतीयांनी इंग्रजी शासन हटविण्याचा विडा उचलला व भारताला स्वातंत्र मिळवून दिले.

**भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल**

**संमिश्र राष्ट्रवाद**

1857च्या उठावाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, हिंदू आणि मुसलमान हे दोन्ही धर्म, संस्कृती आणि समाज रचना याबाबतीत कितीही भिन्न असले तरी त्यांच्यात आंतरिक बंधू भावना असल्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात ते सहज एकत्र येऊ शकतात . कोणत्याही लढ्यात एकत्र येऊ शकतात .ब्रिटिश सत्ता हिंदू-मुसलमानात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत होतो .परंतु भारतीय राष्ट्रसभेने त्यांचे हे प्रयत्न निष्फळ ठरविले .भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक वंशाचे, जातीचे, धर्मांचे अनेक भाषा बोलणारे लोक असून ते एकसंघपणे साम्राज्यशाहीची लढू शकतील याबाबत स्वातंत्र्यलढ्यातील नेतृत्वास विश्वास होता.

निरनिराळ्या धर्मांचे लोक या देशात हजारो वर्षे नांदत आले आहेत .हिंदू प्रमाणेच बौद्ध व जैन धर्मांचे लोक एकत्र नांदत होते .धामिर्क आचारविचार विभिन्न असले तरी एकाधर्माचा माणूस दुसऱ्या धर्माशी समतेने व सौजन्याने वागू शकतो .संमिश्र राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्याने त्यांनी हिंदू-मुस्लीम-बौद्ध-जैन यांच्या अस्तित्वाचा व एकसंघपणाचा इतिहास पाहून स्वातंत्र्यलढ्यात यासर्वांची मोट बांधून राष्ट्रवाद जोपासण्याचा प्रयत्न केला होता .संत कबीर, संत गुरुनानक, संत तुळशीदास या संतांनी व मोगल बादशहा अकबर यांनी धर्मजुटीवर भर दिला होता.

1885 साली स्थापन झालेली राष्ट्रसभा ही संमिश्र राष्ट्रवादाचे प्रतिक मानले जाते . तिच्या स्थापनेत हिंदू, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती अशा अनीक धर्मांचे लोक होते .विविध धमिर्यांचे एक राष्ट्र झाले तरच त्यांचे दैन्य, दास्य व दारिद्र्य दूर होऊ शकेल हे त्यांनी ओळखले होते .न्या .रानडे यांनी हिंदू-मुसलमान एकत्र आल्याशिवाय या विस्तृत देशाची प्रगती होणार नाही असे म्हटले होते .अकबराने याच मार्गाचा अवलंब केला होता.

धर्माच्या पायावर राष्ट्राची उभारणी नकरता समान हितसंबंध आणि राष्ट्र भावना याच आधारावर करावी व अनेक धर्मांच्या लोकांचे एक राष्ट्र बनवावे असे महमंद पैगंबरानेही मत व्यक्त केले होते .लोकमान्य टिळक, लाला लजतपतराय व बिपिनचंद्र पाल या हिंदू नेत्यांनी तर म.गांधी, मौलाना आझाद आणि अब्दुल गफारखान यांनी भारताला संमिश्र संस्कृतीच्या गौरवातून राष्ट्रवादाची चेतना निर्माण करण्याचे कार्य केले . त्यांच्या मते राष्ट्रवादाच्या मुळाशी सामाईक इतिहास, संस्कृती असते .धामिर्क उत्सव, सण व प्रतिके यातून जन मानसात राष्ट्रवादीचे तना निर्माण करण्याचे प्रचंड सामर्थ्य असते . यासाठी टिळकांनी, शिवजयंती व गणेशोत्सव सुरुकेले .लोकमान्य टिळकांनी गीता रहस्यांतून व मौलाना अब्दूल कलम आझादयांनी कुराणाचे उर्दूभाषांतर करुन धामिर्क संदेश राष्ट्रवादास कशी प्रेरणा देऊ शकतात याचा वस्तू पाठ लोकांसमोर ठेवला .या नेत्यांची धर्म निष्ठाही संकुचित नव्हती तर ती राष्ट्रनिष्ठेला प्रेरणा देण्या साठी होती .सामाजिक व आथिर्क क्रांतीची उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन आझाद वटिळक यांनी संमिश्र राष्ट्रवादाचा पुरस्कार केला.

**हिंदूराष्ट्रवाद**

संमिश्र राष्ट्रवादावर विश्वास ठेवून स्थापन झालेली राष्ट्रसभा हिंदू-मुसलमानांचे एक राष्ट्र बनविण्यात यशस्वी होत आहे म्हणूनच लॉर्ड डफरिन यांनी हिंदू-मूस्लीम ऐक्य तोडण्याचा प्रयत्न सुरु केला .त्याने धर्म-संस्कृती, समाज रचना स्वभाव आणि इतिहास परंपरा या सर्व दृष्टीने हिंदूमुस्लीम यांच्यात अलगता आहे .त्यामुळे त्यांचे एक राष्ट्र कधी ही निर्माण होणार नाही अशी हा काटी सुरु केली .तो डाव फोडा या तत्त्वाचा अवलंब करुन त्याने ेहिंदू-मुस्लीम ऐक्य बिघडण्याचे कार्यकेले .त्यातूनच धर्मा धिष्ठत राष्ट्रवादाला प्रोत्साहन मिळून हिंदू राष्ट्रवाद पुढे आला.

हिंदू हित संबंधाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या क्रियाशील राजकीय संघटना म्हणून 1907 मध्ये पंजाब हिंदू सभाव 1915 मध्ये हिंदू महासभा स्थापन झाली .या संघटनेच्या स्थापनेत मदन मोहन मालविय, लालालज पतराय व हिंदु महा सभेचे अन्य पुढारी यांचा सहभाग होता .पंजाबात हिंदूना मुस्लिमांचे आव्हान भेडसावत होते .हिंदू राष्ट्राच्या निमिर्तीसाठी हिंदूची संख्या वाढविणे, त्यासाठी परधर्मात गेलेल्यांना हिंदु धर्मात आनणे आवश्यक मानले .त्यासाठी 'शुद्धी' आणि 'संघटन' या चळवळी सुरु झाल्या . इटलीतील फॅसिस्ट राजवटीचे हिंदू राष्ट्रवाद्यांना आकर्षण होते .समाजाचे लष्करीकरण आणि सामाजिक परिवर्तन या आधारे हिंदू राष्ट्राची निमिर्तीकरणे हेच उद्दिष्टया संघटनेचे होते.

हिंदू राष्ट्रवादी विचारसरणी निर्माण करण्यात वि.दा.सावरकरांचे योगदन मोठेआहे . त्यांनी हिंदूत्वाची व्याख्या केली .हिंदु मधील दोष दूरकरण्याचे उपाय सुचविले .राष्ट्रनिमिर्ती साठी हिंदू-मुस्लीम ऐक्य असून चालत नाही .तर राष्ट्रनिमिर्तीची तीव्र सामाईक इच्छा असली पाहिजे अशी भूमिका मांडली .जर्मनीमध्ये अल्प संख्यां कज्यूंना जसे देशाबाहेर हुसकावून लावले तसे भारतात मुस्लीमांनाच्या बाबतीत धोरण अवलंबविले पाहिजे अशी भूमिका मांडली .गोवळ करांनीहीच भूमिका मांडली .सावरकरांच्या मते हिंदूत्व केवळ संज्ञान सून इतिहास आहे .हिंदूत्वही संकल्पना धामिर्कन सून राष्ट्रीय, वांशिक व सांस्कृतिक आहे .हिंदूत्व हेच राष्ट्रीयत्व असून हिंदू समाज हाच राष्ट्रीय समाज आहे .हे गडेवार, गोळवळकर, सावरकर यांनी हिंदू राष्ट्रवादाचा पुरस्कार केला होता.

**मुस्लीम राष्ट्रवाद**

स्वातंत्र्य पूर्व कालखंडात भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसही मोठी राजकीय संघटना होती .ही संस्था मुसलमानांचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्यास असमर्थ आहे असे मानून 1906 साली ढाका शहरात अखिल भारतीय मुस्लीम लीग पक्षाची स्थापना झाली .हिंदू-मुस्लीम हे दोन वेगवेगळे राष्ट्र समूह असून त्या साठी द्विराष्ट्रवादाचा सिद्धांत महमदअलीजीना यांनी मांडला.हिंदू-मुस्लीम ऐक्यासाठी ऐकेकाळी आटापिटा करणारे महंमद अलीजीना हेमुुस्लिमांच्या धर्मा धिष्ठीत राष्ट्रवादाचे शिल्पकार व्हावेत हा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील दैवदुविर्लाा समानावा लागेल .मुस्लिम समाजात संशय निर्माण करण्यात जीना यशस्वी झाले .मुस्लिम समाज जर लीगच्या झेंड्याखाली संघटितपणे उभा राहिला नाही तर हिंदूची गुलामी पत्करावी लागेल असा प्रचार त्यांनी केला .'इस्लाम खतऱ्यात आहे' ही

त्यांची घोषणा लोकांच्या मनात भिडली .हिंदू आणि मुस्लिम धर्म नसून त्या वेग वेगळ्या प्रकारच्या सामाजिक व्यवस्था आहेत .हिंदू आणि मुस्लिम यांचे एक सामाईक राष्ट्र साकार होईल हे केवळ स्वप्न आहे .हिंदू-मुसलमान यांचे धामिर्क तत्त्वज्ञान, सामाजिक प्रथा वेगवेगळ्या आहेत .त्यांची जीवनविषयक भूमिका व धारणा भिन्न आहे .हिंदू-मुस्लिम संख्येने लहान-मोठे आहेत ही दोन्ही भिन्न राष्ट्रे एका राज्यात कोंबणे म्हणजे असंतोष आणि विनाशाला निमंत्रण ठरेल .महंमद अली जीना देशाच्या स्वातंत्र्याचे भोक्ते असले तरी मुस्लिमांच्या जमातीय व्यक्तीत्ववादाचे खंबीर पुरस्कर्ते होते .देशावर कोणत्याही प्रकारचे कृत्रिम ऐक्य किंवा काल्पनिक राष्ट्रीयत्व लादण्याला त्यांचा विरोध होता .महंमद इक्बाल यांनी 1930 साली असे मत व्यक्त केले की, एकसंघ हिंदूस्थानची कल्पना गृहीत धरुन तिच्यावर संविधानाची उभारणी करणे किंवा ब्रिटिशांच्या लोकशाही विचारांनी घालून दिलेली तत्त्वे यादेशाला लागू करणे म्हणजे अंतर्गत यादवीचे बीजारोपण करणेच आहे . याचा अर्थ मुस्लिम राष्ट्रवादाला खतपाणी घालून वेगळ्या राज्याची निमिर्ती हेच जीनांचे ध्येय होते.

**धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद**

भारताची शासनव्यवस्था, सरकार हे कोणत्याही धर्माच्या आधारे चालविले जाणार नाही .भारताचे शासन हे लोकबलावर चालणारे शासन आहे .धर्म ही संकल्पना मध्ययुगीन समाजव्यवस्थेच्या धोरणाला सहाय्य करणारी असल्याने ते आधुनिक वैज्ञानिक विश्वव्यवहाराशी व वैज्ञानिक दृष्टीकोनाशी विसंगत व विरुद्ध ठरते .भारतासारख्या किमान पाच धर्मांना जन्म देणाऱ्या देशात धर्माधिष्ठीत राज्य ही संकल्पना अव्यवहार्य व कालबाह्य ठरते .एवढेच नव्हे तर ती भारताच्या नव्या फाळणीला कारणही ठरते . अनेकवेळा निकालात निघालेल्या धर्माधिष्ठित राज्यव्यवस्था कालबाह्य ठरल्या व धर्मनिरपेक्षतेचे ऐतिहासिक दर्शन भारताच्या लोकांनी अनेक वेळा दाखवून दिलेले असल्याने भारतीय लोकजीवन आणि राष्ट्रीय मूल्य म्हणून धर्मनिरपेक्षतेलाच अनन्य साधारण महत्त्व आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, ज्या सामाजिक परिस्थितीत अनेक धर्म, वंश, जाती-जनजाती परस्परांचा आदर करतील, एकमेकांशी सर्जनशील व चिकित्सक संवाद साधून सहानुभूतीपूर्वक परस्परांना समजावून घेऊन एकत्रित करतील असे कार्य धर्मनिरपेक्षतावादीच करु शकतील त्यासाठी गटागटामधील राजकीय सत्ता व आथिर्क संशोधन यामधील विषमता दूर करावी लागेल .सर्व संघटनांमध्ये त्यांना सहभागी करुन घ्यावे लागेल .तरच राष्ट्रवादाला धर्मनिरपेक्ष स्वरुप प्राप्त होईल.

**राष्ट्रनिमिर्तीत महान व्यक्तीचे योगदान**

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच इतिहास केवळ राजकीय नसून तो समाज सुधारणा व सांस्कृतिक प्रबोधनाचाही आहे .स्वामी दयानंद सरस्वती, रविंद्रनाथ टागोर, सय्यद अहमदखान, मोहमद इक्बाल, लोकमान्य टिळक यांचे योगदान मोलाचे आहे .या सर्वांनी आपल्या जनतेस गुलामीची जाणीव करुन दिली .स्वामी दयानंद सरस्वती यांनी

धामिर्क शुद्धीकरण, स्वामी विवेकानंदांनी भारतीय धर्म विश्वमंचावर स्पष्ट केला .रविंद्रनाथ टागोरांनी साहित्यातून भारतमातेचे महत्त्व पटवून दिले .सय्यद अहमद यांनी मुस्लिमवर्ग शिक्षित करण्याकडे लक्ष दिले .मौलांना अब्दुल कलम आझाद यांच्या नेतृत्वाखाली भारत छोडो आंदोलन यशस्वी केले .त्यांनी मुस्लिम युवकांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचे काम केले .महम्मद इकबाल या महकवीने 'सारे जहाँसे अच्छा' हे गीत, लोकमान्यांनी अग्रलेख लिहून ब्रिटिशांची झोप उडविली .या सर्व महान व्यक्तींच्या विचार व कार्यातून भारतात ऐतिहासिक, राजकीय ,धामिर्क, सांस्कृतिक सद्भावाचे वातावरण निर्माण होऊन राष्ट्रवादी विचारांचे बीजारोहण झालेले दिसते.

वरिल विचारां व्यतिरीक्त भारताच्या राष्ट्र निमिर्तीस महात्मा फुले, डॉ.आंबेडकर यांचे सकारात्मक विचार पोषक ठरलेले आहेत .त्यांच्या मते परंपरेने ज्यांना सत्तेबाहेर ठेवले, जे विकासापासून वंचित आहेत अशांना राष्ट्रीय प्रवाहात आणणे, तसेच स्त्री शुद्रातिशुद्रांना त्यांचे हक्क व प्रतिष्ठा मिळवून देणे हे फुले, आंबेडकरांच्या राष्ट्रनिमिर्तीचे सूत्र होते.

भारतीय राष्ट्रवादाचे वर्तमान स्थान

स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय राष्ट्रवादाचे स्वरुप, स्थान आणि स्वातंत्र्योत्तरकाळातील भारतीय राष्ट्रवादाचे स्वरुप यामध्ये फरक दिसून येतो . पारतंत्र्याच्या काळात राष्ट्रवादाचा संबंध परकीय राजवटीशी येतो .तर स्वातंत्र्योत्तर काळात तो राज्यसंस्थेच्या आणि देशाच्या बळकटीसाठी आवश्यक ठरतो .पारतंत्र्यात असताना भारताला स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्यासाठी भारतीय राष्ट्रवादाने महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे .जुलमी ब्रिटिश राजवटीविरुद्ध भारतातील सर्वधर्मांचे, पंथांचे, जातीचे लोक राष्ट्रवादाच्या प्रखर भावनेने एकत्र येऊन ब्रिटिशांविरुद्ध लढले आणि भारताला स्वातंत्र्य प्राप्त करुन दिले .स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्रराष्ट्राच्या आणि देशाच्या बळकटीसाठी जो राष्ट्रवाद अपेक्षित होता तो फारसा दिसून येत नाही.

स्वातंत्र्यानंतर भारतात राष्ट्रवादाचे नवे स्वरुप समोर आले .सांस्कृतिक राष्ट्रवाद, हिंदू राष्ट्रवाद, प्रादेशिक राष्ट्रवाद आणि मुस्लिम राष्ट्रवाद अशीही नवीन रुपे दिसून आली आहेत .या स्वरुपाच्या राष्ट्रवादामुळे भारतातील राष्ट्रीय एकात्मतेला धोका निर्माण झाला आहे .सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार आजही हिंदूत्ववादी राजकीय पक्षांकडून आणि नेत्याकडून केला जातो .भारताच्या भवितव्याच्या दृष्टीकोनातून भौगोलिक सलगता व सांस्कृतिक एकता हे राष्ट्रवादाचे दोन घटक महत्त्वाचे असले तरी समतोल आथिर्क विकास, सामाजिक न्याय, विकेंद्रीकरण, अल्पसंख्यांकाची सुरक्षितता ह्यागोष्टीदेखील आवश्यक ठरतात .केवळ धर्म संस्कृतीच्या नावाखाली लोक एकत्र राहायला तयार नाहीत.

भारतात समान संस्कृतीच्या आधारे जहाल सांस्कृतिक राष्ट्रवाद उभा राहिला .टिळकांनंतर गांधी, नेहरुयुग आले आणि भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले .स्वातंत्र्यानंतर मात्र उपराष्ट्रवाद आणि प्रादेशिक राष्ट्रवाद उदयाला आले .

**स्वातंत्र्यपूर्वकाळात आणि वर्तमान स्थितीतही हिंदूराष्ट्रवादाचे समर्थन करण्यात आले . हिंदूराष्ट्रवादाचे समर्थन आणि धामिर्क पुनरुज्जीवन हा हिंदू जातीयवादाचा गाभा आहे . जागतिक पातळीवर धर्म हे मूल्य पुन:श्च प्रस्थापित होऊ पाहत आहे.**

**आता भारताला राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे .त्यामुळे भारताने धर्मनिरपेक्ष आणि मानवतावादी राष्ट्रवादावर भर दिला पाहिजे .शेवटी राष्ट्र मानवतेच्या आधारावर उभे असते .वर्तमानस्थितीत अत्यंतिक राष्ट्रवाद भारतासाठी घातक आहे . भारताने धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राच्या हितासाठी व्यक्तीने धर्माचा विचार करु नये, राष्ट्राच्या विकासासाठी व्यापक आणि विधायक स्वरुपाचा राष्ट्रवाद ही काळाची गरज आहे.**

**थोडक्यात भारतीय राष्ट्रवादाचे वर्तमान स्थान आणि स्वरुप बहुतांश प्रमाणात धर्मनिरपेक्ष आहे असे म्हणता येईल.**

**सारांश**

**राष्ट्रवाद ही एक सार्वत्रिक स्वरुपात आढळणारी राजकीय संकल्पना आहे . राष्ट्रवाद हा आधुनिक राज्याच्या इतिहासाचा अविभाज्य भाग आहे .राष्ट्रगीत किंवा राष्ट्रध्वजाचा सन्मान राखणे असो किंवा वांशिक स्थलांतरावर बंधने आणण्याचा प्रश्न असो सर्वत्र प्रखर राष्ट्रवाद दिसून येतो .राष्ट्रवादाने नेहमीच लोकशाही आणि उदारमतवादी विचारांसोबत एकत्र प्रवास केला आहे .राष्ट्रवाद ही राष्ट्र उभारणीसाठी मोठी शक्ती म्हणून सिद्ध होऊ शकते .विशाल आणि समस्याग्रस्त समाजामध्ये परिवर्तन आणण्याची शक्ती राष्ट्रवादामध्ये आहे .वसाहतवादातून बाहेर पडलेल्या समाजासाठी राष्ट्रवाद हा वरदान ठरु शकतो .कारण तिसऱ्या जगातील समाजामध्ये विशाल अशी विविधता पूर्ण लोकसंख्येला एकत्र आणणे हे एक आव्हान आहे .तसेच त्या समाजां विषमता पूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेत टिकून रहावयाचे आहे .तसेच राष्ट्रवाद ही धामिर्क, जहालमतवादी, कट्टरपंथीयता तसेच फॅसिझमशी जोडला जात आहे .म्हणूनच राष्ट्रवाद हा प्रगतीकारक आहे की विनाशकारक आहे हे ठरविण्यासाठी त्यांच्या उदयासाठी कारणीभूत ठरलेल्या ऐतिहासिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे .विशेषत :आधुनिक राज्याशी राष्ट्रवादाचे असलेले संबंध तपासून पाहणे महत्त्वाचे आहे .राष्ट्रवाद हा एकाच वेळी सार्वत्रिक व स्थानिक स्वरुपाचा तसेच सामान्य आणि असामान्य स्वरुपाचा असू शकतो . तो विवेकनिष्ठ व विवेकशून्य ही असू शकतो .म्हणूनच 21व्या शतकातही राष्ट्रवाद ही शक्तीशाली विचारधारा म्हणून कायम आहे, यात शंका नाही.**

**संदर्भ**

1. राजकीय सिद्धांत परिचय –राजीव भार्गव, अशोक आचार्य
2. आधुनिक भारतातील राजकीय विचार -डॉ.भा.ल.भोळे
3. शतकांत्तराच्या वळणावर -डॉ.भा.ल.भोळे, किशोरबेडकिहाळ
4. राज्यशास्त्राची मूलतत्त्वे -प्रा.चिं.ग.घांगरेकर
5. राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण -डॉ.भा.ल.भोळे